इचलकरंजी महानगरपालिका, इचलकरंजी
वाहन विभाग,
जा.क्र.वाहन/ 343 /2024
दि. 16/02/2024

## सर्क्युलर

इचलकरंजी महानगरपालिकेच्या सर्व नोंदणीकृत मक्तेदार व संस्था नोंदणी प्रमाणपत्र पुरवठाधारक यांना कळविणेत येते की, इचलकरंजी महानगरपालिकेकरिता इनोव्हा, कार व जीप प्रकारातील वाहने त्यावरील वाहनचालक व इंधनासह भाडेतत्वावर पुरविणे कामाचे अंदाजपत्रक तयार करणेबाबतच्या कोटेशन दरासंबंधी मा. आयुक्त यांचे दि. 05-02-2024 अन्वये महानगरपालिका वेबसाईटवरून तसेच नोटीस बोर्डावर प्रसिद्धी देऊन दरपत्रक / कोटेशन मागविणेस मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार सदरचे काम आपण किती व कोणत्या दराने करणेस तयार आहात याबाबतचे सोबत जोडले तक्त्याखाली नमूद केले सूचनेप्रमाणे आपले दरपत्रक / कोटेशन खालील अटीस अधीन राहुन देणेचे आहे.

१. प्रस्तुतकामी महानगरपालिकेने ठरवून दिलेल्या नमुन्यात दर देणेत यावेत.
२. वाहने भाडेतत्वावर पुरवठा करावयाचे दर सर्व टॅक्ससह असली पाहिजे किंवा त्याबाबत तसा स्पष्ट खुलासा असला पाहिजे.
३. प्रस्तुतकामी बाजारातून आलेले दर हे फक्त अंदाजपत्रक तयार करणेस तसेच अंदाजपत्रकिय तरतूद निश्चित करणेसाठी मर्यादित राहतील.
४. आलेले दरपत्रक / कोटेशन पैकी कोणताही कमीचा अगर जास्तीचा मंजूर अगर नामंजूर करणेचा अधिकार महानगरपालिकेने राखून ठेवला आहे. त्याची कोणतीही कारणे दिली जाणार नाही.
५. सदर कामाची पूर्तता महानगरपालिकेचे सुचनेप्रमाणे करणे बंधनकारक राहील.
६. कामासंबंधी अधिक माहिती वाहन विभागाकडे मिळेल.

Scanned by CamScanner

तरी सदरचे सर्क्युलर मधील सोबत जोडले तक्त्यानुसार **दर नमूद करून सिलबंद** दरपत्रक / **कोटेशन** दि. १६/०२/२०२५ ते दि. २०/०२/२०२५ अखेर सांय.५:०० वाजेपर्यंत महानगरपालिकेच्या बारनिशी विभागाकडे देणेची आहेत. प्राप्त **सिलबंद** दरपत्रक / **कोटेशन** शक्यतो दि. २१/०२/२०२५ रोजी सकाळी 11.00 वाजता उघडणेत येतील **त्यावेळी संबंधीतांनी समक्ष** हजर रहावे.

**सौरभ साळुंके**
वाहन अधिक्षक

---

| अ. क्र. | मक्तेदार नाव | सही |
|---|---|---|
| 1) | | |
| 2) | | |
| 3) | | |

**प्रत नोटीस बोर्डावर लावणे कामी.**

Scanned by CamScanner

टिप :-

१) सदरचे सर्व दर संबंधित वाहन, त्यावरील वाहनचालक व त्यासाठीचे इंधन यासह देनेत यावेत.

२) मक्तेदाराने दर भरताना जीएसटी शिवाय व अनुज्ञेय असलेले सर्व करांसह भरावेत. अनुज्ञेय जीएसटी अतिरीक्तपणे येईल.

३) वरील दर देताना इनोव्हा कार तसेच जीप इ. वाहनाचे दर वेगवेगळे देणेत यावे.

४) तसेच दर देताना मासिक (३००० कि.मी.) वर त्यानंतरच्या जादा कि.मी. साठी स्वतंत्र दर देण्यात यावे.

५) वातानुकुलित व विना वातानुकुलित वाहनांचे दर वेगवेगळे देनेत यावे.

६) कर वसुलीकामी वापरणेत येणाऱ्या नॉन एसी जीप प्रकारातील वाहनासाठी आवश्यकते नुसार लागणारे वाहनावर स्पीकर सेट, ॲम्पलीफायर व माईक इ. यंत्रनेसह वाहन पुराविणेचे दरासह देणेत यावेत.

७) सदरची वाहने पुरविण्यास वाहन शहराबाहेर प्रवास करताना द्यावयाचा टोल,पार्किंग चार्जेस तसेच स्पीड लिमिट दंड इ. बाबी संबंधित मक्तेदाराने भरणे बंधनकारक राहील.

सौरभ साळुंके

वाहन अधिक्षक

Scanned by CamScanner

**इचलकरंजी महानगरपालिका**

**वाहन विभाग**

**( खालीलप्रमाणे दर भरण्यात यावे )**

| वाहन प्रकार | मासिक ३००० कि.मी. करीता ( दैनंदिन २४ तास प्रमाणे) | ३००० कि.मी. नंतर प्रति जादा कि.मी. करीता दर | बाहेरगावी वाहन गेल्यास नाईट होल्ट चार्जेस रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| १) इनोव्हा क्रेस्टा (वातानुकुलित) | | | |
| २) स्विफ्ट डिझायर, ह्युंदाई, ॲक्सेंट, इटिओस, सीडान (वातानुकुलित)/विना.वा | | | |
| ३) जीप, तवेरा, सुमो व तत्सम विना वातानुकुलित /विना.वा (स्पीकर,अँप्लीफायर व माईक सुविधेसह) | | | |

Scanned by CamScanner